# MT- 162

Seat No. | | | | | | | |

**2013 .... .... 1100**

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - II

**Time : 3 Hours** **(Pages 5)** **Max. Marks : 80**

---

प्र.१. अ) **योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

१) हिमालयाचं मला झालेलं पहिलं दर्शन केवळ ..........

अ) अविस्मरणीय. ब) अद्‌भुत. क) आश्चर्यजनक.

२) खादी व स्वदेशी हे ..........

अ) जीवनध्येय होते. ब) जीवनव्रत होते. क) जीवनगान होते.

३) माझ्या वैयक्तिक जीवनाच्या निराशेतही ..........

अ) मी आनंदात राहिले. ब) जगण्याची 'आशा' चिवट राहिली.

क) इतरांना मदत करीत राहिलो.

४) वडिलांचं नाव त्याने बंगल्याला दिल्याचं पाहून मला ..........

अ) समाधान वाटलं. ब) वाईट वाटलं. क) सुख झालं.

प्र.१. आ) **रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

१) हे उत्सव आवाज किंवा गर्दी या दोन्ही मुद्द्यांवर .......... ठरता कामा नयेत.

(उपद्रवकारक, नियमबाह्य, अडथळा)

२) इथं येण्यापूर्वी कधी न ऐकलेला हा आवाज ..........

(वाऱ्याचा, पाण्याचा, शांततेचा)

३) रविवर्म्यानं आपला .......... पानाचा डबा गोद वर्म्याच्या हाती दिला.

(पितळेचा, चांदीचा, तांब्याचा)

प्र.१. इ) **खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) बाबांनी जगाच्या नकाशात कोणते स्थान उच्च स्थानावर नेऊन ठेवले आहे ?

२) 'माझे विद्यापीठ' हा काव्यसंग्रह कधी प्रकाशित झाला ?

३) जमिनीला डांबरी रस्त्यामुळे कुणाचे दर्शन होत नाही ?

**प्र.२. अ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) 'भारत छोडो' आंदोलनात लेखक चंद्रशेखर धर्माधिकारी कशा प्रकारे सहभागी झाले ?

२) हिमालयाचे दर्शन लेखकांस अविस्मरणीय का वाटते ?

३) नागिणीच्या बोलण्याचा मुंग्यांवर काय परिणाम झाला ?

४) बाबा आमटे यांची संवेदनशील वृत्ती स्पष्ट करा.

५) केशव आपल्या बंगल्याचे वर्णन कसे करतो ?

**प्र.२. आ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

१) ''भारतीय आई काय किंवा अमेरिकन आई काय, मुलांचे कौतुक दोघींनाही सारखेच प्रिय असते की !''

२) ''अरे तुम्ही माझ्याशी कसंही वागता, मग माझी पाने फाटतात.''

**प्र.३. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) स्त्रियांनी कोणाप्रमाणे स्वतः जळून इतरांना प्रकाश द्यावा, असे कवीला वाटते ?

२) सेना महाराज यांचा सर्व थकवा कशामुळे गेला ?

३) कवीच्या मते चिमण्यांच्या ओठी काय दिसेल ?

**प्र.३. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

१) चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना अमुचे लाख .......... (नमस्कार, मुजरे, प्रणाम)

२) डोळ्यापुढती येतो जेव्हा .......... गाव. (आठवणीचा, मनातला, स्मरणातला)

३) मातीलाही सुगंध यावा .......... भाकरीचा. (ज्वारीच्या, कष्टाच्या, घामाच्या)

**प्र.४. अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

१) 'वसे तो सदा स्वेदगंगेकिनारी !'

२) अभ्रीची छाया काय साच खरी । तैसीच हे परी संसाराची ।।

**प्र.४. आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) पंढरीनाथाचा महिमा संत नरहरी सोनार यांनी कसा वर्णिला आहे?

२) माझ्या घरट्यात कोणत्या गोष्टी नाहीत, असे कवी म्हणतो ?

३) कवीच्या मते स्त्रीने आपले हक्क मिळविण्यासाठी काय करावे ?

४) कवीला कोणता प्रलय अपेक्षित आहे ? का ?

५) कवयित्रीने आपल्या देशातील वेगळेपण कसे वर्णिले आहे ?

**प्र.५. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

१) नागनाथअण्णा यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्यचळवळीत कसा भाग घेतला ?

२) पंढरपूर आणि रत्नागिरी या गावांतील कोणती वैशिष्ट्ये लेखकाने वर्णन केली आहेत ?

३) जुईचे आईबाबा घरी कोणती कामे करतात?

४) पाण्याचे महत्त्व, अम्मा पत्रातून कशी लिहिते ?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

१) 'नातवंडांस पत्र' या पाठाचा सारांश लिहा.

२) 'प्रतिसरकार' या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.६. अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

१) नागीण मूंग्यांच्या बीळात शिरली.

२) मासतरही माझ्या उततराची अपेक्षा करत नसत.

**प्र.६. आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

१) सप्ताह २) भाऊबहीण ३) खरेखोटे ४) पालापाचोळा

**प्र.६. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१) या बोलण्याचे खूपच अनंत प्रकार असतात. (उद्‌गारार्थी करा.)

२) विवेकाचं भान कधीही विसरू नये. (आज्ञार्थी करा.)

३) आम्ही कधी आपण होऊन परस्थांच्या घरी अनाहूतपणे जात नाही. (प्रश्नार्थी करा.)

**प्र.६. ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(त्याग करणे, रूपांतर होणे, मन न रमणे, स्वप्नांचे महाल बांधणे, गुण्यागोविंदाने राहणे, श्रीगणेशा करणे)

१) आईने आपल्या मुलांबद्दल खूप स्वप्नं बघितली होती.

२) वकिली व्यवसाय त्यांना आवडत नसे.

३) रमेशने आपल्या तत्त्वांसाठी शहरातील मोठ्या पगाराची नोकरी सोडून दिली.

४) विणकर लोक कापसाचा कापडामध्ये बदल करतात.

५) आमच्या कुटुंबातले आम्ही सारेच जण खूप आनंदात राहतो.

६) लग्नानंतर त्या नवीन जोडप्यांनी आपल्या संसाराला सुरूवात केली.

प्र.७. अ) **खालील उतारा वाचून त्यावर <u>चार</u> प्रश्न तयार करा.** **4**

पंडित जवाहरलाल नेहरूंना बालपणापासूनच सुखसुविधामय जीवनाचा तिटकारा होता. म्हणूनच साऱ्या सुखाला लाथ मारून गुलामी, गरिबी, निरक्षरता, रुढींचे प्राबल्य, अंधविश्वास याविरुद्ध त्यांनी जोरदार आवाज उठवला. स्वराज्य व स्वदेशीची चळवळ ह्या गोष्टी नेहरू राजकारणात येण्यापूर्वीपासून चालू होत्या. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधीसारख्या सशक्त नेत्यांचा त्यांना पाठिंबा मिळाला. पण नेहरूंच्या आगमनाने त्या चळवळींना अधिक तेज लाभले.

नेहरूंच्या गुणी व्यक्तिमत्त्वामुळे त्यांना अपार लोकप्रियता मिळाली. संपत्ती आणि आनंदभुवन हे आपले राहत असलेले घर त्यांनी देशसेवेसाठी अर्पित केले. ते सच्चे नायक, तरुणांवर व बालकांवर मनस्वी प्रेम करणारे प्रेमी व द्रष्टे होते. आजचा नवा वैज्ञानिक भारत ही नेहरुंचीच देणगी आहे. असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

प्र.७. आ) **खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य <u>शीर्षक</u> देऊन <u>तात्पर्य</u> लिहा. (कोणतीही एक)** **4**

१) **मुद्दे :-** एक बालक प्रेमी राजा – त्याच्या पदरी एक सीदी नावाचा कर्मचारी – आपल्या 'नगरीमधून सर्वांगसुंदर बालक शोधून घेऊन ये' अशी राजाने आज्ञा देणे – कर्मचाऱ्याचे संपूर्ण नगरात भटकणे – शोध घेणे – प्रत्येक बालकात कोणती ना कोणती उणीव भासणे – थकून घरी परतणे – अंगणात स्वतःच्या बालकाला खेळत असताना पाहणे – काळासावळा – त्याला तोच सर्वांगसुंदर वाटणे – त्यालाच राजाकडे घेऊन जाणे – तात्पर्य.

२) **मुद्दे :-** एक विधवा स्त्री – एकुलता एक मुलगा – मुलाचे अचानक निधन – पुत्र वियोगाचे दुःख – भगवान बुद्धांकडे धाव – उपाय – ज्या घरी कोणी मेलेला नाही अशा घरातून मूठभर मोहरीची मागणी – घरोघरी, गावोगावी भटकणे – मृत्यू झाला नाही असे एकही घर न मिळणे – बुद्धांच्या म्हणण्याचा अर्थबोध होणे – तात्पर्य.

प्र.७. इ) **खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा.** **4**

१) संदिप/ सुदिपा चव्हाण, लोकमान्य टिळक रोड, भांडूप (पू.), मुंबई - ४२ हा/ ही रस्त्यावरील कर्कश आवाजामुळे अभ्यासात येणाऱ्या व्यत्ययाबद्दल पोलीस इन्स्पेक्टर, भांडूप पोलीस स्टेशन, मुंबई - ४२ यांच्याकडे तक्रार करतो/ करते. (लिफाफा आवश्यक)

२) कृणाल / कमल माने,१३५, साईसदन, सदाशिव पेठ, पुणे येथून रस्त्यावरील कचरापेटीची दुर्दशा मा.आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांना पत्र लिहून कळवत आहे. (लिफाफा आवश्यक)

<u>**किंवा**</u>

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

तुमच्या शाळेत भरविण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनाचा वृत्तांत लिहा.

<u>**किंवा**</u>

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

टूथपेस्टची जाहिरात तयार करा.

प्र.८. **खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

१) **विज्ञानाचे महत्त्व**

(**मुद्दे :-** विज्ञान एक वरदान - विज्ञानामुळे मानवाला झालेला फायदा - मिळालेली शक्ती - नवीन शोध, निर्मिती औद्योगिक क्रांती - अंतराळाचा विस्तार, समुद्राची खोली यांची माहिती - वैद्यकीय प्रगती, यंत्रमानव - सुखसोयी - आयुष्यात नाविन्यता - ज्ञानाचा विस्तार - शेवट.)

२) **मी पंतप्रधान झालो तर ....**

(**मुद्दे :-** कल्पना कशी सुचली ? - तुम्ही काय कराल ? - देशातील भ्रष्टाचार, गरिबी दूर - सर्वांना शिक्षण - मानवता प्रस्थापित - सकारात्मक विचार - कल्पना योग्य - शेवट.)

३) **अपंग तरूणाचे आत्मवृत्त**

(**मुद्दे :-** निसर्गाने केलेला अन्याय - दुःखद बालपण - आईचा आधार - शाळेत प्रवेश - नेटाने अभ्यास - अपंग पुनर्वसन केंद्रात प्रवेश - अपंगत्वावर मात - जीवनात प्राप्त केलेली सफलता.)

**Best Of Luck** 👍

PAPER - II

# MT-162

2013 .... .... 1100

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - II

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| १) | हिमालयाचं मला झालेलं पहिलं दर्शन केवळ **अविस्मरणीय.** | 1 |
| २) | खादी व स्वदेशी हे **जीवनव्रत होते.** | 1 |
| ३) | माझ्या वैयक्तिक जीवनाच्या निराशेतही **जगण्याची 'आशा' चिवट राहिली.** | 1 |
| ४) | वडिलांचं नाव त्याने बंगल्याला दिल्याचं पाहून मला **समाधान वाटलं.** | 1 |
| उ.१. | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| १) | हे उत्सव आवाज किंवा गर्दी या दोन्ही मुद्द्यांवर **उपद्रवकारक** ठरता कामा नयेत. | 1 |
| २) | इथं येण्यापूर्वी कधी न ऐकलेला हा आवाज **शांततेचा**. | 1 |
| ३) | रविवर्म्यानं आपला **चांदीचा** पानाचा डबा गोद वर्म्याच्या हाती दिला. | 1 |
| उ.१. | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | बाबांनी 'आनंदवन' हे स्थान जगाच्या नकाशात उच्च स्थानावर नेऊन ठेवले आहे. | 1 |
| २) | १९६६ साली 'माझे विद्यापीठ' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. | 1 |
| ३) | जमिनीला डांबरी रस्त्यामुळे सूर्याचे दर्शन होत नाही. | 1 |
| उ.२. | **अ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'शाश्वत शिक्षणसंपत्ती' हा पाठ लेखक 'चंद्रशेखर धर्माधिकारी' यांनी लिहिला आहे. 'ज्या शिक्षकांकडून शिकायला मिळाले, जगायला मिळाले, तीच खरी शिक्षणसंपत्ती ठरली', ही लेखकाची स्वतःची भावना येथे व्यक्त झाली आहे.<br>स्वायत्त गरिबीचा आनंद उपभोगत असतानाच लेखक बिनभिंतींच्या शाळेत अधिक शिकले. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते गांधीजींच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या नवभारत विद्यालयात दाखल झाले. त्यात 'जीवन शिक्षण' चालू असताना, १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात त्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला. त्यात नेत्यांच्या आदेशानुसार शाळा बंद पाडली. संपूर्णतः अहिंसक सत्याग्रहाद्वारा भूमिगत राहून त्याही वयात समवयस्कांसोबत ते आंदोलन चालविले. त्यात काहीजणांना अटक झाली. काहीजणांना तुरुंगात डांबले गेले. परंतु लेखक वयाने लहान असल्यामुळे त्यांना तुरुंगात जावे लागले नाही पण त्यांनी भूमिगत राहून आंदोलन सुरू ठेवले.<br>अशाप्रकारे स्वातंत्र्याच्या व महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने प्रभावीत होऊन लेखक 'भारत छोडो' आंदोलनात सहभागी झाले. | 3 |

| | | |
|---|---|---|
| २) | 'हिमालय' हा पाठ लेखक 'प्रभाकर पेंढारकर' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने हिमालयाचे मनाला मोहिनी घालणारे दर्शन घडविले आहे.<br>लेखक हिमालयाच्या पर्वत रांगामधून फिरत असताना आधी सिमल्याला गेले. तिथून पुढे नारकंड्याला गेले असता लेखकाला हिमालयाची शुभ्रधवल हिमशिखरं एकदम दिसू लागली. एकाच्या पाठोपाठ दुसरं, तिसरं ....... नजर पाहू शकेल एवढी शिखरंच शिखर लेखकाला दिसली. ज्याप्रमाणे एखाद्याला घरातून सागर दिसावा त्याप्रमाणे लेखकाला हिमालय दिसत होता. हिमशिखरावरुन रेंगाळणारे ढग खाली उतरलेले दिसले. दूरवरचा किन्नोर कैलास, बलदंड देहाचा रारंग ढांग आणि त्याला विळखा घालून वाहणारी सतलज नदी या साऱ्या गोष्टी अविस्मरणीय होत्या.<br>वरील सर्व गोष्टींमुळेच 'हिमालयाचं मला झालेलं पहिलं दर्शन केवळ अविस्मरणीय' असे पेंढारकर म्हणतात. | 3 |
| ३) | 'वारूळ' हा पाठ लेखक 'अनिल त्र्यंबक अवचट' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने वारुळाविषयी मुंग्यांची भावना तसेच मुंग्या आणि नागिणीचे परस्परसंबंध स्पष्ट केले आहेत.<br>माणूस अविचाराने वागून सृष्टीचा सत्यानाश करू लागला आहे, अशाप्रकारचे नागिणीचे शहाणपणाचे विचार सगळ्या मुंग्या शांतपणे ऐकत होत्या. नागिणीचे बोलणे ऐकून त्यांचे मन भरून आले. त्यांच्या मुलांचेही डोळे उघडले. पावसाळ्यात वारूळ वाहून जाते, या गोष्टीची खंत त्यांना राहिली नाही. आपले घर, वारूळ पावसाळ्यात वाहून गेले तरी चालेल पण माणसांप्रमाणे सिमेंटची परमनंट घरं बनवायची नाहीत. मातीपासून वारूळ बनवून निसर्ग नियमाप्रमाणे वागायचे, असे त्यांनी ठरवले.<br>अशाप्रकारे नागिणीच्या बोलण्यामुळे मुंग्या व त्यांच्या मुलांच्या मनात पर्यावरण रक्षणाची भावना निर्माण झाली. | 3 |
| ४) | 'माणुसकीचा झरा' हा पाठ लेखिका 'चित्रलेखा पुरंदरे' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने 'आनंदवन' ही कुष्ठरोग्यांची वसाहत निर्माण करण्यामागे बाबा आमटे यांची असलेली संवेदनशीलता दाखवून दिली आहे.<br>बाबा आमटे वडिलांच्या इच्छेनुसार वकिली करत होते. पुढे ते वरोऱ्याच्या नगरपालिकेचे उपाध्यक्ष झाले. त्या कामाबरोबर त्यांचे इतर समाजकार्य चालू होते. हे कार्य करत असताना एके दिवशी त्यांना रस्त्याच्या कडेला असह्य वेदनांनी कण्हत असलेला एक महारोगी म्हणजेच तुळशीराम त्यांना दिसला. त्यानंतर अशा महारोग्यांची सेवा करण्याचे व्रत त्यांनी घेतले. वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने तुळशीरामचा मृत्यू झालेला पाहून त्यांना अतिशय दुःख झाले. त्यावेळी या वेदनेचे आनंदात रूपांतर करण्याचा ध्यास त्यांनी घेतला. त्यातून साधनाताईंच्या मदतीने त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी 'आनंदवन' निर्मिले. | 3 |

| | | |
|---|---|---|
| | कुष्ठरोगाचा अभ्यास करण्यासाठी ते कलकत्त्याला गेले. कुष्ठरोग कोणत्याही प्राण्याला होत नाही. त्यामुळे यावरचे संशोधन करण्यालाही त्यांनी स्वतःचे शरीर देऊ केले. कुष्ठरोगाचे जंतू स्वतःच्या शरीरात वेचून घेण्यासाठी ते तयार झाले.<br>आनंदवनाच्या निर्मितीसाठी बाबांनी वरोऱ्याला श्रमाश्रमाचा प्रयोग केला. सर्व जातीधर्माच्या लोकांनी एकत्र आनंदाने राहायचे. प्रत्येकाने दिवसभर आपापले काम करायचे. संध्याकाळी जमलेल्या मजुरीतून भाजी-भाकरी बनवायची आणि मजेने खायची. बाबांची ही छोटी वसाहत अनेक वर्षे गुण्यागोविंदाने आनंदात राहत होती.<br>अशाप्रकारे समाजकार्यातून बाबा आमटे यांची संवेदनशील वृत्ती दिसून येते. | |
| ५) | 'बाबूजी' हा पाठ लेखक 'संजय गिरासे' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने आपल्या मुला-मुलींसाठी आयुष्यभर कष्ट करणाऱ्या आईवडिलांकडे मुलांनी केलेल्या दुर्लक्षामुळे संवेदनशील मनाला खूप यातना होतात, याचे दर्शन घडविले आहे.<br>केशवने नाशिकला एक छोटासा बंगला बांधला होता. या बंगल्याला त्याने आपल्या वडिलांचे म्हणजे 'बाबूजी' हे नाव दिले होते. बंगल्याचा दिवाणखाना दृष्ट लागावी असा होता. त्याने हॉल, किचन, बेडरूम सगळीकडे स्पार्टेक बसवून घेतले होते. किचनच्या ओट्याला पंचवीस हजार रूपये खर्च आला होता. नऊ फूट लांबीचा ओटा होता आणि त्यावर ग्रीन मार्बल बसविले होते. साडेआठशे रूपयांचा नळ होता. त्याचबरोबर मिस्तरीला सांगून चार खुर्च्यांचा डायनिंग टेबल बनवून घेतला होता. बाथरूमला बसवलेली वॉल टाईल्स खास इंदौरहून आणलेली होती. बेडरूम दुसऱ्या मजल्यावर होती. फॅशन नसल्यामुळे बाबूजींचा फोटो हॉलऐवजी जिन्यामध्ये लावला होता. बेडरूमच्या सजावटीसाठी पंचेचाळीस हजार खर्च केले होते. खिडक्यांना दोन्ही बाजूंनी ग्रील लावली होती. स्टोअर रूम चांगली होती. गच्चीवर त्याने झोपाळा लावला होता. वर लाईट लावलेला होता. शिवाय बंगल्याला 'बाबूजी' हे जे नाव दिले होते. ते खास ऑर्डर देऊन पुण्याहून बनवून घेतलं होतं. त्याला मर्क्युरी कोटिंग होती. त्यामुळे बंगल्याच्या जवळून जाणाऱ्या मेन हायवेवरून ते नाव ठळकपणे दिसतं. त्या नावामुळे बंगल्याला उठाव आलेला होता. या सगळ्याबरोबरच केशवने सुरक्षिततेसाठी दरवाजादेखील मजबूत करून घेतला होता. शिवाय चोरांनी कशाही प्रकारे दरवाजा उघडलाच तर आपोआप वाजणारी एक इलेक्ट्रॉनिक बेलही तेथे लावलेली होती.<br>अशाप्रकारे केशवने आपल्या ऐश्वर्यसंपन्न बंगल्याचे वर्णन केले आहे. | **3** |
| उ.२.<br>१) | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**<br>**<u>संदर्भ</u> :** वरील वाक्य 'संवाद, विसंवाद' या लेखिका 'शांता शेळके' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात संवादाच्या विविध प्रकारांबद्दल, त्यातील अडथळ्यांबाबत लेखिकेने माहिती दिली आहे.<br>**<u>स्पष्टीकरण</u> :** एकदा लेखिकेला मातृत्वाबद्दल अतिशय सुंदर अनुभव अनुभवायला मिळाला. त्याविषयी सांगताना लेखिका सांगते, अमेरिकन सुपरमार्केटमध्ये एक अमेरिकन तरूणी | **3** |

| | | |
|---|---|---|
| | भेटली. बाबागाडीतली तिची छोटी मुलगी खूपच गोड होती. न राहवल्यामुळे लेखिकेने तिचे कौतुक केले व तिच्या आईलाही ते कौतुक फार आवडले. पुढे जवळजवळ घटकाभर मुलांविषयीच गप्पा मारतच त्या दोघीही बसल्या. या गप्पांतून लेखिकेला जाणवले की मातृत्व जगामध्ये सर्वत्र समान असते.<br>**वैशिष्ट्य** : मातृत्वाचे लेखिकेने केलेले वर्णन येथे योग्य वाटते. | |
| २) | **संदर्भ** : वरील वाक्य 'काय राव पुस्तकराव !' या लेखक 'दासू वैद्य' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखक आपल्या जीवनातील पुस्तकांचे महत्त्व सांगतात. तसेच पुस्तकांची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करतात.<br>**स्पष्टीकरण** : मंदार आणि मानसी अभ्यास करता करता झोपतात. मंदार पुस्तक बाजूला टाकून देतो आणि झोपतो तर मानसी पुस्तक वाचता वाचता झोपते. तिच्या अंगाखाली पुस्तक पार चुरगळले जाते. त्यामुळे पुस्तकांना फार त्रास होतो. त्याचबरोबर मोठी माणसेही कधीकधी पुस्तकं, कादंबऱ्या वाचतात. अर्धवट वाचून झाल्यावर खूण म्हणून पुस्तकाचे पान दुमडून ठेवतात. शिवाय कधी कधी पुस्तकं माळ्यावर, गाडीच्या डिकीत टाकून देतात. अशा प्रकारच्या वागण्याने पुस्तकांची खराब अवस्था होते. त्यांची पाने फाटतात. त्यामुळेच मानसी व मंदारला याची जाणीव करून देण्यासाठी पुस्तकरावांनी दुःखी होऊन वरील विधान म्हटले आहे.<br>**वैशिष्ट्य** : पुस्तकं प्रेमाने, काळजीपूर्वक हाताळावीत हे येथे सुचविले आहे. | 3 |
| उ.३. | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | स्त्रियांनी दिव्याप्रमाणे स्वतः जळून इतरांना प्रकाश द्यावा, असे कवीला वाटते. | 1 |
| २) | संतचरण दिसल्यामुळे सेना महाराज यांचा सर्व थकवा गेला. | 1 |
| ३) | कवीच्या मते चिमण्यांच्या ओठी खुले हसणे दिसेल. | 1 |
| उ.३. | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| १) | चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना अमुचे लाख **प्रणाम**. | 1 |
| २) | डोळ्यापुढती येतो जेव्हा **आठवणीचा** गाव. | 1 |
| ३) | मातीलाही सुगंध यावा **कष्टाच्या** भाकरीचा. | 1 |
| उ.४. | **अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** | |
| १) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'जिथे राबती हात' या कवितेतून घेतल्या आहेत. त्याचे कवी 'ग. दि. माडगूळकर' आहेत. या कवितेत कवीने आपल्या जीवनातील श्रमाचे महत्त्व सांगितले आहे.<br>**स्पष्टीकरण** : परमेश्वराला मुनिब्राह्मणांचे होम-हवन, मंत्र-तंत्र अजिबात आवडत नाहीत. त्याला श्वासांचे-घणांचे गीत आवडते. म्हणजेच मेहनत करताना श्रमिकांच्या होणाऱ्या | 3 |

| | | |
|---|---|---|
| | श्वासांचा आवाज, हातोड्यांची (घणांची) ठकठक जणू हे गीत त्याला आवडते. असा हा परमेश्वर श्रद्धारूपी गंगा, यमुना या नद्यांच्या किनाऱ्यावर न राहता नेहमी घामरूपी गंगेच्या किनाऱ्यावरच म्हणजेच जिथे घाम गाळून कष्ट केले जातात तेथे राहतो.<br>**<u>वैशिष्ट्य</u> :** मंत्र-तंत्रापेक्षा कष्टाने, मेहनतीने परमेश्वराला प्रसन्न करून घ्या, असेच जणू कवी येथे सुचवत आहेत. | |
| २) | **<u>संदर्भ</u> :** वरील पद्यपंक्ती <u>'किती हे सुख'</u> या <u>'संत सोयराबाई'</u> यांच्या अभंगातून घेण्यात आल्या आहेत. या अभंगात स्वतःच्या स्वार्थात, मी पणात गुंतलेल्या व्यक्तीची फजिती होते, याचे वर्णन केले आहे.<br>**<u>स्पष्टीकरण</u> :** माणसे संसारात, प्रपंचात खरे सुख मानतात. मोहमायेत अडकून पडतात. पत्नी, पुत्र यासारख्या नातेसंबंधात त्यांचे मन गुंतलेले असते. धन, संपत्ती या मोहजालात ते गुरफटून पडतात. अशा या संसारातून मिळणारे सुख हे क्षणिक असते. ज्याप्रमाणे आकाशातील ढगांची सावली जरी खरी वाटत असली तरी ती क्षणिक असते. त्याचप्रमाणे संसारातील सुख क्षणभंगूर असते.<br>**<u>वैशिष्ट्य</u> :** या ठिकाणी संत सोयराबाईंची सूक्ष्म निरीक्षणशक्ती दिसून येते. | **3** |
| उ.४.<br>१) | **आ) कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.**<br><u>'कृपा करी पंढरीनाथा'</u> हा अभंग <u>'संत नरहरी सोनार'</u> यांनी लिहिला आहे. या अभंगामध्ये भक्तांचा सांभाळ करणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा वर्णन केला आहे.<br>पंढरपूरचा पंढरीनाथ भक्तांवर नेहमीच कृपा करणारा कृपावंत आहे. तो दीन-दुबळ्यांची, गरिबांची मदत करणारा दीनानाथ आहे. जीवन जगत असताना भक्तांच्या हातून कळत नकळतपणे अनेक चुका, अनेक अपराध घडतात. पांडुरंग अशा भक्तांच्या अपराधांना क्षमा करतो. तो भक्तांचा सांभाळ करतो. ज्यांना कोणाचाही आधार उरलेला नाही अशा अनाथांवर कृपा करणारा तो कृपाळू आहे. भक्तांकडून अनेकवेळा अन्यायकारक गोष्टी घडतात. इतरांवर खूप अन्याय केले जातात. अशा वेळी माफी मागितली तर विठ्ठल अशा अन्यायी भक्तांनाही माफ करतो. अशा या पंढरीनाथाचा महिमा खरंच खूप अगाध आहे, अमर्याद आहे. कितीही समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी तो समजत नाही.<br>अशाप्रकारे संत नरहरी सोनार यांनी पंढरीनाथाचा महिमा वर्णिला आहे. | **3** |
| २) | <u>'माझ्या घरट्यात'</u> ही कविता कवी <u>'सूर्यकांत खांडेकर'</u> यांनी लिहिली आहे. या कवितेत भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा संदेश व्यक्त होतो.<br>भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती महत्त्वाची असते. त्याबाबत कवी म्हणतो, त्याच्या घरट्यात म्हणजेच घरात हिऱ्यामाणकांची रास नाही. म्हणजेच त्याच्याकडे मौल्यवान वस्तू नाहीत. त्याच्या घरट्यात कल्पफुलांचा संभार म्हणजेच कल्पनेतील फुलांचा साठा नाही. कवीच्या घरात भौतिक ऐश्वर्य कुठेच दिसत नाही. त्याच्या घरी चांदरातीचे मोहोळ म्हणजेच | **3** |

| | | |
|---|---|---|
| | केवळ स्वप्नरंजकता नाही. कवीच्या घरात एकतारी एकस्वर असल्यामुळे सातसुरांचा झंकार म्हणजेच वाद, संघर्ष दिसत नाही. शेवटी कवी म्हणतो की, त्याच्या घरात सुखासमाधानाचे वातावरण असल्यामुळे तेथे कधीही कोणाच्याही कपाळाला आठी दिसत नाही.<br>अशा या विविध गोष्टी कवीच्या घरट्यात नाहीत. | |
| ३) | 'आपण धरणी गं' ही कविता कवी 'ऋषीकेश कांबळे' यांनी लिहिली आहे. या कवितेत स्त्रीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देत आपले हक्क मिळवण्याचे आवाहन केले आहे.<br>स्त्रीमध्ये सर्व प्रकारची योग्यता असते. ती त्यागमय जीवन जगत असते. स्वतः सर्व प्रकारचे हाल सोसून दुःख गिळून साऱ्या जगाला पोसत असते. स्वतःच्या मनाची, इच्छा-आकांक्षांची माती करून नातीगोती जपत असते. मात्र एवढे सगळे करूनही तिला सतत उपेक्षेला बळी जावे लागते. पण या सगळ्या गोष्टींचा आता भूतकाळ व्हावा असे कवितेतील स्त्री म्हणते.<br>या स्त्रीने इतर महान स्त्रियांची, त्यांच्या कर्तृत्वाची ओळख करून घ्यावी आणि आपणही त्याच मार्गाने चालावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यासाठी तिने दुःख न बाळगता कणखर बनले पाहिजे असे कवितेतील स्त्री म्हणते. ती म्हणते, आता तू अन्यायाविरुद्ध ललकारी देऊन पुढे ये. अंधार दूर करण्यासाठी दिवा जसा जळतो तशी आता तूही तुझ्या तेजाने तळपून जा आणि या अंधारावर मात करताना उजेडाचे गाणे म्हणत जा.<br>अशाप्रकारे आपले हक्क मिळविण्यासाठी स्त्रीने जागृत होऊन लढले पाहिजे, असे कवीला वाटते. | **3** |
| ४) | 'प्रलय' ही कविता कवी 'रोहिदास पोटे' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने माणसातील माणूसपण कोणत्याही बंधनांनी जखडलेले नसावे, असा विचार व्यक्त केला आहे.<br>समाजातील चालीरिती, रूढी, जातीव्यवस्था इ. गोष्टींमुळे माणूस माणूसपण हरवत चालला आहे. त्यामुळे कवी अस्वस्थ होतो. अशावेळी कवीला वाटते की, खूप मोठा प्रलय व्हावा. ज्यायोगे स्वार्थाने, मी पणाने भरलेली घरे व शहरे म्हणजेच स्वार्थी सामाजिक समूह नष्ट व्हावेत. त्या जागेवर एकाच आकाराची, विचाराची, उंचीची भेदाभेदरहित घरे व शहरे निर्माण व्हावीत. माणसाचे विचार समाजातील जुन्या वाईट विचारांना धरून पुढे जात आहेत. त्यामुळे असा प्रलय व्हावा की विचारांचे प्रवाह बदलावेत आणि चांगल्या विचारांच्या झऱ्यांनी तळागाळातील लोकांची प्रगती व्हावी. त्यामुळे समाजातील विषमता नष्ट होईल व समानता निर्माण होईल. त्याचप्रमाणे 'माणूस' व 'माणुसकी' यांचे अतूट नाते निर्माण होईल. समाजात सकारात्मक बदल होऊन मातीलाही कष्टाच्या भाकरीचा सुगंध येईल.<br>अशाप्रकारे माणसालाही माणूस म्हणून किंमत प्राप्त व्हावी असा प्रलय कवीला अपेक्षित आहे. | **3** |

| | | |
|---|---|---|
| ५) | 'एकत्वाचे गीत महान' ही कविता कवयित्री 'आश्लेषा महाजन' यांनी लिहिली आहे. या कवितेत आपल्या देशात विविधतेत एकता कशी नांदते याचे सुंदर वर्णन केले आहे.<br>देशातील विविधतेतील एकतेचे वर्णन करताना कवयित्री इंद्रधनुष्याचे उदाहरण देते. जसे इंद्रधनुष्यात जरी विविध रंग असले तरी त्याची कमान एकच असते. तशीच भारतातही ही विविधतेतील एकता दिसून येते. आपल्या देशात वेगवेगळे प्रांत आहेत. या प्रांतातील लोकांची रूपे, त्यांची भाषा वेगळी आहे. परंपरा, पूजाअर्चा आणि परमेश्वर भक्तीचे त्यांचे मार्गही वेगवेगळे आहेत. त्याचबरोबर त्यांची वेशभूषा यामध्येही आपल्याला विविधता असल्याचे आढळून येते.<br>अशा विविध बाबींमुळे देशातील वेगळेपण दिसून येते. | 3 |
| उ.५. | **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>१९२० नंतर स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व म. गांधी यांच्याकडे आले होते. सत्य, अहिंसा व सत्याग्रह यांच्या सहाय्याने हा लढा तीव्र बनला होता. याच काळात लेखक नागनाथअण्णा कोल्हापूरला 'प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग'मध्ये राहून शिक्षण घेत होते. लेखकाच्या लहानपणी नाना पाटील यांच्या वाळव्यात सभा होत होत्या. तेव्हा लेखक तिरंगी झेंडा खाद्यांवर घेऊन मिरवणुकीत अग्रभागी असायचे. कोल्हापूरात विद्यार्थिदशेतच लेखक राष्ट्रसेवादलात जाऊ लागले होते. तेथे वैचारिक प्रबोधन होत होते. त्या प्रबोधनामुळे इंग्रजांची सत्ता घालविण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावली पाहिजे ही जाणीव तीव्र होत होती. कोल्हापुरमध्ये त्या काळात स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून विद्यार्थी चळवळ जोमाने वाढत होती. त्याच निमित्ताने लेखकाने त्याच्या काही विद्यार्थी मित्रांसह मुंबईत धाव घेतली होती. स्वयंसेवकाच्या वेशात प्रवेश मिळविला होता. गांधीजीची पूर्ण स्वातंत्र्याची मागणी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या भावनाप्रधान व जोशपूर्ण भाषणाने लेखक भारावून गेले आणि शिक्षण सोडून पूर्णपणे स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वतःला झोकून द्यायला तयार झाले होते.<br>अशाप्रकारे नागनाथअण्णा यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. | 4 |
| २) | 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>पंढरपुरातील नागरिकांचे स्नान हे चंद्रभागेच्या पाण्यात वेगळ्याच शैलीत चालते. पंढरपुरीच्या चंद्रभागा स्नानाला पावित्र्याचा स्पर्श असतो. श्लोक, मंत्र, स्तोत्र म्हणत, मनात | 4 |

| | | |
|---|---|---|
| | विठ्ठलाचे ध्यान करत स्नान केले जाते. स्नानानंतर लोक घरी न जाता प्रथम विठ्ठल मंदिराकडे जातात व नंतरच घरी जातात. लेखक जेव्हा १९६१ मध्ये पंढरपुरला गेले तेव्हा ते गाव सकाळी आठ वाजेपर्यंत झोपलेले असायचे. प्रत्येक दुकानाच्या आडव्या फळ्यांवर माणसे खुशाल झोपलेली दिसत. पंढरपुरी संस्कृती वेगळ्या उद्योगाची होती. ती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली असायची. विठ्ठलमंदिर हे त्या संस्कृतीचे केंद्र होते. पंढरपुरीत मठांची संख्या भरपूर आहे. वर्षभर पंचक्रोशीतील आणि वारीच्या वेळी वारकरी तेथे जमत असत. पंढरपुरात गल्ल्यांना, चौकांना तसेच दुकानांनाही साधुसंतांची नावे दिलेली दिसतात.<br>रत्नागिरी शहरात एकही तालीम नाही. येथील मासळी बाजार खूप मोठा आहे. त्याचा उग्र वास वातावरणात भरलेला असतो. लाल, लाल साध्या रस्त्यांचे देखणेपण रत्नागिरीला लाभले आहे. समुद्राची गाज रात्रभर वातावरणात गंभीरपणे भरून राहते. येथे पावसाळ्यात आणि हिवाळ्यातही थंडी वाजत नाही, याचे लेखकाला आश्चर्य वाटते.<br>अशाप्रकारे पंढरपूर आणि रत्नागिरी या गावांतील विविध वैशिष्ट्ये लेखकाने वर्णन केली आहेत. | |
| ३) | <u>'मुलांचे स्वप्न'</u> हा पाठ लेखिका <u>'सोनाली नवांगुळ'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. खूप मुले-मुली त्यांच्याकडे शिकायला यायची. जुईची आई घरातली शक्य तितकी कामं करून वाचनालयात जाते. जुईचे बाबा जुईला जेवायला वाढतात आणि मग स्वतः जेवून भांडीही धुवून ठेवतात. जुई जेव्हा शाळेतून येते, तेव्हा जुईची आई भाजी, दळण घेऊन येत असते. ती यायच्या आधीच जुईचे बाबा मस्त चहा करतात आणि सगळे चहा पितात. जुईची आई पटकन चटमट खाऊ करते. नंतर बाबा क्लास घ्यायला तयार होतात. जुई खेळून आल्यावर जुईचे आई किंवा बाबा जुईचा अभ्यास घेतात. जुईची आई स्वयंपाक करते. बाबा ताटं घेतात. मग सगळे मिळून जेवतात.<br>अशाप्रकारे जुईचे आईबाबा सहकार्याने घरातली सारी कामे करतात. | **4** |
| ४) | <u>'नातवंडांस पत्र'</u> हा पाठ लेखिका <u>'मृणालिनी साराभाई'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून केला आहे.<br>पाण्याचे महत्त्व सांगताना अम्मा लिहिते की, स्नान करताना आपण पर्वतांमधून, खोल खोल दऱ्याखोऱ्यांमधून व महान नद्यांतून येणाऱ्या आशीर्वाद स्वरूप पाण्याचे स्मरण ठेवावे. कोणतेही जीवन पाण्याविना अशक्य आहे. पिण्यासाठी जर एकही थेंब मिळाला नाहीतर आपली अवस्था खूप वाईट होईल. तेव्हा पाण्याबाबत खबरदारी घ्यावी. त्याचा एकही थेंब वाया जाणार नाही, याची काळजी घ्यावी. आपण देशातील जलस्त्रोत स्वच्छ | **4** |

ठेवायला मदत करायला हवी, अशी शपथ घेऊया. ज्यामुळे सगळ्या लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळेल. त्याचबरोबर पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे.

अशाप्रकारे अम्मा पत्रातून पाण्याचे महत्त्व नातवंडांना समजावून सांगते.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**

१) 'नातवंडांस पत्र' हा पाठ लेखिका 'मृणालिनी साराभाई' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून केला आहे. **8**

लेखिका आपल्या नातवंडांना पूर्णपणे ओळखते. त्यांच्या सवयी तिला माहिती आहेत. जगातील हिंसा, अभिलाषा, मत्सर या दुष्टप्रवृत्तीपासून तिला आपल्या नातवंडांस वाचवायचे आहे आणि म्हणून ती त्यांना म्हणते जेव्हा तुम्ही मोठे व्हाल तेव्हा या शत्रूंना जिंकून घ्या. यासाठी दिवसाची सुरूवात प्रार्थनेने करा. त्यामुळे मनातील वाईट विचार दूर होतील. एकत्र खेळण्याने एकोपा वाढतो. पण असे साधे खेळ खेळतानासुद्धा कुणाचा द्वेष करू नका.

ज्या धरतीने तुमचे पालनपोषण केले तिचे ऋण मानायला विसरू नका. पाणी हे जीवन आहे, त्याचा जपून वापर करा. निसर्गाचे संवर्धन करा. निसर्गाचा समतोल कायम ठेवायचा असेल, पाऊस चांगला पडायला हवा असेल तर वृक्षांची जोपासना करायलाच हवी. जो शेतकरी त्याच्या देशासाठी अन्न पिकवतो त्याला किती कष्ट घ्यावे लागतात याचा विचार करा. आपण ब्रेड आणि लोणी ही न्याहारी करताना त्यासाठी कोणी किती कष्ट घेतले असतील याचा विचार करा. पुस्तक हे मित्र आहेत. तेव्हा ती वापरताना त्यांची काळजी घ्या. त्या पुस्तकात अनमोल ज्ञानाचे भांडार असते. पुस्तकातील शब्द म्हणजे मौज, कुतूहल असते. त्या शब्दांवर प्रेम करा. त्यांना वाचा म्हणजे सारे जग तुमच्यासाठी खुले होईल.

अशाप्रकारे शेवटी लेखिका आपल्या नातवंडास सांगते, स्वतः जगा व दुसऱ्यास जगू द्या. आपले जीवन इतरांना आनंद देण्यासाठी असावे. सर्वांना मदत करा आणि आपल्या कार्याने साऱ्या जगासाठी तुम्हीच आशीर्वाद व्हा.

२) 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे. **8**

लेखक नागनाथअण्णा नायकवडी यांनी मॅट्रिकचे शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात लेखकाने सक्रिय सहभाग घेतला. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या स्थापनेत ते क्रियाशील सदस्य होते.

१९४२ साली मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरूद्ध 'चले जाव' आंदोलनाचा नारा दिला. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. अनेक ठिकाणी प्रचंड जमावांनी इंग्रज सत्तेविरूद्ध असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोष्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या गेल्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. मामलेदार कचेरीवर मोर्चे निघाले होते.

| | | |
|---|---|---|
| | याच काळात देशात काही ठिकाणी इंग्रजांचा कायदा मानायचा नाही, स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करायचे या विचाराने 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'सातारा' येथे स्थापन झालेले 'प्रतिसरकार' दीर्घकाळ टिकले. प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांकडून गावागावात ऐक्य निर्माण करून मतभेद मिटविण्याचा प्रयत्न केला जात होता. गावांत शांतता नांदेल याकडे कटाक्षाने पाहिले जात होते. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरूणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. राष्ट्रीय आंदोलनात वाढ व्हावी म्हणून सभा परिषदा घेतल्या जायच्या. खादीचा प्रचार केला जायचा. सत्याग्रह, व्यसनमुक्ती, शारीरिक जोपासना, संघटित सामर्थ्य याकडे लक्ष दिले जायचे. सामाजिक नीतिमूल्ये निर्माण केली जायची. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्त्री-पुरूष समानता, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निमूर्लन, गांधी-विवाह पद्धती, ग्रामस्वच्छता, सामाजिक न्याय प्रस्थापना कार्यक्रम राबविले जायचे.<br>परंतु काही वाईट प्रवृत्तींच्या लोकांनी हे प्रतिसरकार बदनाम करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण प्रतिसरकारने या वाईट प्रवृत्तींच्या लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी सुव्यवस्था, न्यायनिवाडा यांची कडक अंमलबजावणी केली. | |
| उ.६. | **अ) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमानुसार लिहा.** | |
| १) | नागीण **<u>मुंग्यांच्या</u>** **<u>बिळात</u>** शिरली. | 2 |
| २) | **<u>मास्तरही</u>** माझ्या **<u>उत्तराची</u>** अपेक्षा करत नसत. | 2 |
| उ.६. | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| १) | सप्ताह - सात दिवसांचा समूह - द्विगू समास | 1 |
| २) | भाऊबहीण - भाऊ आणि बहीण - इतरेतर द्वंद्व समास | 1 |
| ३) | खरेखोटे - खरे किंवा खोटे - वैकल्पिक द्वंद्व समास | 1 |
| ४) | पालापाचोळा - पाला, पाचोळा वगैरे - समाहार द्वंद्व समास | 1 |
| उ.६. | **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| १) | केवढे अनंत प्रकार असतात या बोलण्याचे ! | 1 |
| २) | विवेकाचं भान कधीही विसरू नका. | 1 |
| ३) | आम्ही कधी आपण होऊन परस्थांच्या घरी अनाहूतपणे जातो का ? | 1 |
| उ.६. | **ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| १) | आईने आपल्या मुलांबद्दल **<u>स्वप्नांचे महाल बांधले होते</u>**. | 1 |
| २) | वकिली व्यवसायात त्यांचे **<u>मन रमत नसे</u>**. | 1 |
| ३) | रमेशने आपल्या तत्त्वांसाठी शहरातील मोठ्या पगाराच्या नोकरीचा **<u>त्याग केला</u>**. | 1 |
| ४) | विणकर लोक कापसाचे कापडामध्ये **<u>रूपांतर करतात</u>**. | 1 |

| | | |
|---|---|---|
| ५) | आमच्या कुटुंबातले आम्ही सारेच जण **गुण्यागोविंदाने राहतो**. | 1 |
| ६) | लग्नानंतर त्या नवीन जोडप्यांनी आपल्या संसाराचा **श्रीगणेशा केला**. | 1 |
| | | |
| उ.७. | **अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** | |
| १) | नेहरूंना बालपणापासून कशाचा तिटकारा होता ? | 1 |
| २) | नेहरूंच्या आगमनाने चळवळींना काय लाभले ? | 1 |
| ३) | नेहरूंनी कशाविरूद्‌ध जोरदार आवाज उठविला ? | 1 |
| ४) | नेहरूंनी देशसेवेसाठी काय अर्पण केले ? | 1 |
| | | |
| उ.७. | **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 52 - Q.02 | 4 |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 55 - Q.08 | 4 |
| | | |
| उ.७. | **इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 87 - Q.02 | 4 |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 93 - Q.08 | 4 |
| | **किंवा** | |
| उ.७. | **इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No.100 - Q.02 | 4 |
| | **किंवा** | |
| उ.७. | **इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 108 - Q.03 | 4 |
| | | |
| उ.८. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 04 - Q.04 | 10 |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 23 - Q.20 | 10 |
| ३) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 35 - Q.32 | 10 |